**नि.क्र.१४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ याची साक्ष</u> –**

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : विनोद दिनकर भोपळे
वय सुमारे : ५० वर्षे, धंदा – निरीक्षक मोटार वाहन, आरटीओ कार्यालय सिंधुदुर्ग
राहणार : ओरोस ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत –</u>**

**०१.** मी सिंधुदुर्गनगरी आर.टी.ओ.कार्यालयामध्ये सप्टेबर २०२१ पासून निरीक्षक म्हणून कार्यरत आहे. मी या गुन्हयातील दुचाकी वाहनाची तपासणी केली होती. त्याचा क्रमांक एम.एच.–०७/अेपी–८६५८ होता. त्यानुसार मी माझा मेकॅनिकल इन्सपेक्शन रिपोर्ट दिला होता. आता मला दिनांक ०७/०६/२०२५ रोजीचा मी दिलेला मेकॅनिकल इन्सपेक्शन रिपोर्ट दाखवला, तो तोच आहे, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. नि.पी–५/पीडब्ल्यू ४** देण्यात येते. मी सदर वाहनाची तपासणी केलेबाबत त्याची निरिक्षणे कॉलम क्र.२२ मध्ये नोंदविलेली आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.पी.एम.मुजावर यांचे मार्फत</u> –**

**०२.** मला सदर वाहन तपासणी बाबतचे पत्र कोणत्या तारखेला मिळाले होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात न जाता माझे कार्यालयात बसुनच वाहन न तपासता सदरचा अहवाल तयार करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतेही पत्र मिळाले नव्हते, मी आर.टी.ओ. कार्यालयातच बसुन खोटा अहवाल दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

<u>फेरतपास</u> – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.03.24 18:47:21 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– २४/०३/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.